# कार्यालय मध्यवर्ती संशोधन केंद्र
## डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापिठ, अकोला

**दूरध्वनी क्र.: ०७२४-२२५८११९** **इ-मेल: directorcrs78@gmail.com**


जा.क्र. म.सं.के./कर्मशाळा/ १२४ /२०२२ दि. २ / ५ /२०२२

**निविदा सूचना**

**विषय:- मध्यवर्ती संशोधन केंद्र अंतर्गत कर्मशाळा विभागातील जळालेले व खराब झालेले काळे ऑइल/वंगण तेल विक्री करण्याकरिता सीलबंद निविदा बोलाविण्याबाबत..........**

वरील विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते कि, मध्यवर्ती संशोधन केंद्र अंतर्गत कर्मशाळा विभागातील जळालेले व खराब झालेले काळे ऑइल/वंगण तेल अंदाजे २००० ते २५०० लिटर विक्री करण्याकरिता उपलब्ध आहे. तरी ते घेऊ इच्छिणाऱ्यांनी खालील प्रमाणे अटी व शर्तीस अधीन राहून जास्तीत जास्त घाऊक भाव सोबत जोडलेल्या निविदा पत्रात भरून या कार्यालयास सादर करावे.

**अटी व शर्ती**

१. मसुदामधे नमूद तपशिलानुसार कोटेशन सादर केल्यास कोटेशन विचारात घेण्यात येईल.
२. निविदा/कोटेशन संचालक, मध्यवर्ती संशोधन केंद्र, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला याचे नावाने सीलबंद लिफाफामधे पाठवावी व लिफाफ्यावर "जळालेले काळे ऑइल/वंगण तेलाचे भाव" नमूद केलेले असावे.
३. कोटेशन/निविदा पत्रक कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सकाळी १०.०० ते दुपारी ५.३० या वेळेत स्वीकारल्या जातील.
४. जळालेले व खराब झालेले काळे ऑइल/वंगण तेल या कार्यालायचे कर्मशाळा विभागावर मिळेल.
५. जळालेले व खराब झालेले काळे ऑइल/वंगण तेलाचे संपूर्ण माप झाल्यनंतर व संपूर्ण रक्कमेचा भरणा झाल्यानंतरच जळालेले ऑइल/वंगण तेल उचलता येईल.
६. जळालेले ऑइल/वंगण तेल नेण्यासाठी रिकामे डब्बे/ड्रम व मजूर यांची व्यवस्था निविदाधारकाने करावयाची आहे. या कार्यालयाकडून कोणत्याही प्रकारचे मनुष्यबळ व डब्बे/ड्रम पुरविण्यात येणार नाही.
७. आदेशाच्या दिनांकापासून ८ दिवसाचे आत दिलेल्या तपशिलानुसार घेतलेल्या साहित्याची उचल करण्यात यावी अन्यथा प्रत्येक दिवसाला रु. १०० प्रमाणे दंड भरावा लागेल.
८. जळालेले ऑइल/वंगण तेल विक्री केल्यानंतर करा संबंधी कोणतीही तक्रार आल्यास हे कार्यालय जवाबदार राहणार नाही व कराचा विहित मुदतीमध्ये भरणा करण्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित निविदाधारकाची राहील.
९. जळालेले ऑइल/वंगण तेलाचे मोजमाप व उचल करतांना कोणत्याही प्रकारची हानी/अपघात झाल्यास हे कार्यालय जवाबदार राहणार नाही.
१०. वरीलप्रमाणे अटी व शर्तीस अधीन राहून सोबत जोडलेल्या निविदा मसुदा तपशिला नुसार **दि. ११.०५.२०२२** रोजी पर्यंत कार्यालयीन वेळेत निविदा सीलबंद लीफाफामध्ये सादर करावी. नमूद केलेल्या वेळेनंतर जी निविदा मिळेल ती स्वीकारल्या जाणार नाही.
११. निविदेतील जळालेले ऑइल/वंगण तेलाचे भाव/दर स्वीकृती किंवा नाकारणे याबाबत सर्व हक्क जळालेले ऑइल/वंगण तेल विक्री करण्याकरिता गठीत समितीने राखून ठेवलेले आहेत.
१२. जळालेले ऑइल/वंगण तेलाचे भाव विक्री करण्याकरिता गठीत समितीस मान्य नसल्यास जळालेले ऑइल/वंगण तेल विक्री करण्यात येणार नाही.
१३. कोटेशन तपशिलासंबंधी अधिक माहितीसाठी कार्यालयीन वेळेत संचालक, मध्यवर्ती संशोधन केंद्र, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला कार्यालयाशी संपर्क साधावा.

Officer In Charge, Agricultural Research Station Cell, Dr. P.D.K.V. Akola — Inward No. 4/05/22 Dt.: 20

संचालक
मध्यवर्ती संशोधन केंद्र
डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला

## कोटेशन/निविदा मसुदा

मध्यवर्ती संशोधन केंद्र, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला अंतर्गत कर्मशाळा विभागातील जळालेले व खराब झालेले काळे ऑइल/वंगण तेलाचे विक्री दर खालील प्रमाणे आहेत.

| अ. क्र. | विवरण | दर (रु.)/प्रति लिटर |
|---|---|---|
| १ | जळालेले व खराब झालेले काळे ऑइल/वंगण तेल | |

निविदा सुचनेमधील संपूर्ण अटी व शर्ती मला सर्वस्वी मान्य आहेत.

**ठिकाण:**

**दिनांक:**

**स्वाक्षरी**
नाव व संपूर्ण
पत्ता